# स्थायी समिती
## दाखल विषय – दि. ३०/८/२०१६

**विषय क्रमांक :– ११५९ त्वर्य**

प्रभाग क्र. ४५ हडपसर स.नं. ७३ ते महंमदवाडी स.नं. ८८ मधून जाणारा डी.पी.रस्ता महंमदवाडी ते हंडेवाडी रोड जोडणारा रस्ता विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.सनशाईन व्हेंचर्स यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. ४९,९९,२५३/- पेक्षा १४.९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४२,४९,४१५=०४ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/४६२ दि. २६/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ११६० त्वर्य**

पुणे शहरास समान पाणीपुरवठा (२४x७) करणेसाठी Designing Providing & Constructing RCC ESR and GSR of various capacities & related Infrastructural Works for Pune City, पाच वर्षे देखभाल दुरुस्ती करणे (आवश्यक त्या सर्व सिव्हील, स्ट्रक्चरल कामांसह) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.लार्सन ॲन्ड टुब्रो लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२३५,९५,३२,६६५/- पेक्षा ३.९४% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.२४५,२४,९८,२५२/- (अक्षरी रक्कम रुपये दोनशे पंचेचाळीस कोटी चोवीस लाख अठ्ठयाण्णव हजार दोनशे बावण्ण) अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांच्याशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पापु/४७४ दि. २९/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ११६१ त्वर्य**

पाषाण येथील पाषाण प्लॉट क्र. स.नं. १५२ येथील १२ मी. रस्त्यावरील पावसाळी लाईन चेंबरचे व इतर काम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.पी.देवकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६४,९९,९११=३८ पेक्षा १२% कमी (सुधारीत)) असल्याने त्यांचेकडून र.रु.५७,१९,९२२=०१ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/४७५ दि. २९/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ११६२ त्वर्य**

राष्ट्रीय केमिकल्स अन्ड फर्टीलायझर्स यांचेकडून प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्त्या विसर्जनासाठी १०० टन अमोनियम बायकार्बोनेट घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/४७७ दि. ३०/८/२०१६ चे पत्र.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ५(२)(२) नुसार राष्ट्रीय केमिकल्स अन्ड फर्टीलायझर्स यांचेकडून प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्त्या विसर्जनासाठी १०० टन अमोनियम बायकार्बोनेट घेणेस

२) सदर अमोनियम बायकार्बोनेट विकत घेण्यासाठी येणारा खर्च अर्थशिर्षक (सन २०१६-२०१७) संकिर्ण आरई १९बी१०२ वरुन अदा करणेस

३) कोटेशनप्रमाणे येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास

**विषय क्रमांक :– ११६३ त्वर्य**

स.नं. २४ धानोरी गिनिज बॅले सोसायटी कंपाऊंड पासून १५५ मी.नाल्याच्या कडेने सिमाभिंत बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बारटक्के कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९९,८१२/- पेक्षा २७.१२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७२,८७,८६२=९८ अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि/४७८ दि. ३०/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ११६४ त्वर्य**

प्रभाग क्र. १२ अ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.टी.जी.धमाणी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५९,९९,३५३/– पेक्षा १.६६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५८,९९,७६३=७४ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/४७९ दि. ३०/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ११६५ त्वर्य**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथे विविध सुधारणा/विकास कामे करणे (अंतर्गत सजावट म्युझियम/लायब्ररी ग्रीनरुम) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री.प्रशांत शशीकांत तळेकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४७,१०,०९५/– पेक्षा २३.७२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३५,९२,८६०=४६ अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत करुन होणाऱ्या कमी/अधिक रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/४८१ दि. ३०/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ११६६ त्वर्य**

प्रभाग क्र. ३६ अ मधील विवेकानंद ई–लर्निंग स्कूल, प्रभात रस्ता, गल्ली नं. १५, पुणे ४ येथे यु.पी.एस.सी. व एम.पी.एस.सी. केंद्र सुरु करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार श्री.प्रशांत श.तळेकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४२,३८,५८६/– पेक्षा २७.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३०,५२,२०५=७७ रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक निविदा अटी शर्तीतील बाजार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/४८२ दि. ३०/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ११६७ त्वर्य**

मा.सौ.हिना मोमीन व मा.फारुक इनामदार यांचे दि. २६/८/२०१६ चे पत्र.

मनपा मुख्य सभा ठराव क्र.७३,दि.७.६.२०१६,दि.७.७.२०१६ व मनपा मुख्य सभा ठराव क्र.२८०,दि.१०.८.२०१६ नुसार प्रभाग क्र. ६० अ र.रु.२५ लाखाचे वर्गीकरणास मान्यता देण्यात आलेली असून सदर रकमेतुन खालील कामे करणेसाठी रक्कम रूपये २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६–१७ चे अंदाजपत्रक<br>मनपा मुख्य सभा ठराव क्र.७३,दि.७.६.२०१६,दि.७.७.२०१६<br>मनपा मुख्य सभा ठराव क्र.२८०,दि.१०.८.२०१६ | २५ लाख | --- |
| <u>सुचविलेले काम –</u><br>प्रभाग क्र.६० अ मध्ये कॉलनी क्र.१० शेजारील नागझरी नाला स्पायडर मशिनने साफ करणे. | --- | २५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :– ११६८ त्वर्य**

मा.अशोक हरणावळ यांचे दि. २६/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ५७ ब मध्ये बाळासाहेब ठाकरे कलादालन, जिजाऊ प्रसुतीगृह व बाळासाहेब ठाकरे दवाखाना येथे हाऊस किपींगचे काम करणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, १०.ख.वाहतूक नियंत्रण, पान क्र. १००, अ.क्र. २, शहरातील वाहतुक सुधारण्यासाठी विविध विकास कामे करणे, (यादी क्र. एसटी२), पान क्र. १९८, अ.क्र. ३५, प्रभाग क्र. ५७ ब मध्ये विविध ठिकाणी बस स्टॉप नुतनीकरण करणे. | १० लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेले काम –</u>** | | |
| प्रभाग क्र. ५७ ब मध्ये बाळासाहेब ठाकरे कलादालन, जिजाऊ प्रसुतीगृह व बाळासाहेब ठाकरे दवाखाना येथे हाऊस किपींगचे काम करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :– ११६९ त्वर्य**

मा.अरविंद शिंदे, विरोधी पक्षनेता यांचे दि. २६/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ४० ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, २.गटारे व नाले सुधारणा, पान क्र. १८, मलनि:सारण विभागाकडील देखभाल दुरुस्तीची कामे (यादी क्र. एसएक्स २), पान क्र. ३१, अ.क्र. ६६, प्रभाग क्र.४० ब मध्ये झोपडपटटी भागात चेंबर्स साफसफाई करणे व इतर कामे करणे. | ३० लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेली कामे –</u>** | | |
| १) प्रभाग क्र.४० ब मध्ये सोमवार पेठ परिसरात ड्रेनेज विषयक कामे करणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.४० ब मध्ये नाना पेठ व रास्ता पेठ परिसरात ड्रेनेज विषयक कामे करणे. | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.४० ब मध्ये मंगळवार पेठ परिसरात ड्रेनेज विषयक कामे करणे. | --- | १०लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :– ११७० त्वर्य**

मा.सचिन दोडके व मा.अविनाश बागवे यांचे दि. २९/८/२०१६ चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. १०४२ दि. २४/८/२०१६ चा फेरविचार करण्यात यावा.

(पुणे पेठ वारजे स.नं. १२५ (पै) ॲमेनिटी स्पेस जागेतील श्री.संत ज्ञानपीठ ग्रंथालय क्षेत्रफळ ४४०.२४ चौ.मी. ची इमारत संयुक्त प्रकल्प ज्ञानरंजन सार्वजनिक वाचनालय, स्नेहांकित कॉलनी, वारजे नाक्यासमोर, पुणे ४११०५८ या संस्थेला ताबा दिनांकापासून ५ वर्ष कालावधीकरीता संयुक्त प्रकल्प तत्वावर चालविणेस देणेबाबतचे मा.महा.आयुक्त यांचे संदर्भाकिंत क्र. १ चे विषयपत्र संदर्भ क्र. ३ चे पत्रानुसार मागे घेण्यास मान्यता देण्याबाबत)

**विषय क्रमांक :– ११७१ त्वर्य**

मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी व मा.सौ.मिनल सरवदे यांचे दि. २९/८/२०१६ चे पत्र.

येरवडा सर्व्हे क्र.४अ/१, ४अ/२ येथे पुणे महानगरपालिकेच्या वतीने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नावाने नाट्यगृहाचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून लवकरच ते पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे कृति समिती येरवडा यांचे प्रयत्नातून झालेल्या आंदोलनातून सदर जागा नाट्यगृहासाठी उपलब्ध झाली आहे. असे वरील कृति समितीने निदर्शनास आणून दिले असून सदर नाट्यगृहात २ अतिरिक्त खोल्या आहे. त्या कृति समितीच्या ताब्यात देऊन लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे समग्र वाड्मंय व इतर समाज परिवर्तन करण्यासाठी कार्य केलेल्या महामानवांचे व संत महात्मे यांचे साहित्य ग्रंथरूपाने जपण्यासाठी सुसज्य ग्रंथालय करण्याचे व ग्रंथालयाची देखभाल करण्याची कृति समितीची मागणी आहे.

तरी नाट्यगृहातील दोन अतिरिक्त खोल्या त्यांचे मागणीनुसार व मनपाच्या नियमानुसार देण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्रमांक :– ११७२ त्वर्य**

मा.अभिजित कदम व मा.सौ.कल्पना थोरवे यांचे दि. ३०/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ७५ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी पान क्र. २९३, अ.क्र. १३ पुणे सातारा रोडवरील राजीव गांधी प्राणीसंग्रहालयासमोर ग्रेड सेपरेटर करणे या कामाचे र.रू. ३ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

नविन सुचविलेली कामे

| अ.क्र. कामाचे नांव | तरतुद अधिक र.रुपये |
|---|---|
| १) भारती विद्यापीठ परिसरात रस्ते कॉक्रीट करणे. | १० लाख |
| २) नारायणधाम, वंडरसिटी परिसरात रस्ते कॉक्रीट करणे | १० लाख |
| ३) दत्तनगर परिसरात रस्ते कॉक्रीट करणे. | १० लाख |
| ४) टेल्को कॉलनी परिसरात रस्ते कॉक्रीट करणे. | १० लाख |
| ५) राजे चौक परिसरात रस्ते कॉक्रीट करणे. | १० लाख |
| ६) आंबेगाव परिसरात रस्ते कॉक्रीट करणे. | १० लाख |
| ७) कात्रज संतोषनगर परिसरात रस्ते कॉक्रीट करणे. | १० लाख |
| ८) औदुंबर सोसायटी गल्लीत ड्रेनेज लाईन टाकणे | १५ लाख |
| ९) भोलेनगर परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे | १५ लाख |
| १०) संतोषनगर परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे | १० लाख |
| ११) प्रभाग क्र.७५ जेटिंग मशीनद्वारे ड्रेनेज लाईन साफसफाई करणे व मेन्टेनन्स करणे | १० लाख |
| १२ ) वंडरसिटी ग्राऊंडवर शाळेतील विद्यार्थ्यांसाठी क्रीडांगण करणे | १० लाख |
| १३) लेकव्हिस्टाशेजारील मैदानात शाळेतील विद्यार्थ्यांसाठी क्रीडांगण विकसित करणे | २५ लाख |
| १४) सोकांडे शाळेशेजारी ताब्यात आलेल्या मैदानात क्रीडांगण विकसित करणे | १० लाख |
| १५) सावंत विहार शेजारी गार्डन विकसित करणे | २५ लाख |
| १६) रेलिकॉन शेजारील जागेत गार्डन व ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र करणे | २५ लाख |
| १७) व्यंकटेशपुरम शेजारील जागेत गार्डन विकसित करणे. | ५ लाख |
| १८) मनस्वी शेजारील जागेत गार्डन विकसित करणे. | १० लाख |
| १९) स.नं.५ दत्तनगर ताब्यात आलेल्या ॲमेनिटीज स्पेस जागेत गार्डन करणे | १० लाख |
| २०) विघ्नहर्तानगर राजगड कॉलनी परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे | २५ लाख |
| २१) बस स्टॉप विविध ठिकाणी करणे | २० लाख |
| २२) प्रभाग क्र.७५ विविध ठिकाणी डांबरी रस्ते करणे | १५ लाख |

**विषय क्रमांक :– ११७३ त्वर्य**

मा.ॲड्.रामचंद्र उर्फ चंदुशेठ कदम यांचे दि. ३०/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. २७ ब मधील सुतारदरा येथील पाणी पुरवठ्यासाठीच्या बुस्टर पंपाकरीता जनरेटरची व्यवस्था करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, ९.पथांची झाडलोट/घनकचरा व्यवस्थापन विभाग, पान क्र. ९८, अ.क्र. १६, घनकचरा संदर्भात शहरात विविध विकास कामे करणे, (यादी एसएच १), पान क्र. २४०, अ.क्र. ४०, प्रभाग क्र. २७ ब प्रभागामध्ये कचरा समस्याविषयक व तदनुषंगिक कामे करणे. | २० लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेले काम –</u>**<br>प्रभाग क्र. २७ ब मधील सुतारदरा येथील पाणी पुरवठ्यासाठीच्या बुस्टर पंपाकरीता जनरेटरची व्यवस्था करणे | --- | २० लाख |

**विषय क्रमांक :– ११७४ त्वर्य**

मा.सुनिल गोगले व मा.अविनाश बागवे यांचे दि. ३०/८/२०१६ चे पत्र.

पुणे शहरात सुमारे ४०% लोकसंख्या ही झोपडपट्टीत राहते. पुणे शहरात एकूण ५६४ घोषित झोपडपट्ट्या आहेत. दि.१/१/२००० पूर्वीच्या प्रत्येक पात्र झोपडपट्टी धारकास स्लम ॲक्ट नूसार फोटोपास असणे आवश्यक आहे. तथापि पुणे मनपाने सन २००३ नंतर कुठल्याही पात्र झोपडपट्टीधारकास फोटोपास दिलेले नाहीत तसेच त्यावेळी सुध्दा फोटोपासचे काम पूर्ण झाले नव्हते.

अतिक्रमण विभागाने जसे पथारीवाल्यांचे बायोमेट्रीक सर्वेक्षण संपूर्ण शहराचे केले व त्यानुसार खात्याने लाभार्थींना परवान्याचे वाटप केले त्यानुसार झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाने सुध्दा झोपडपट्टीधारकांचे बायोमेट्रीक सर्वेक्षण करणे व त्याप्रमाणे पात्र व अपात्र झोपडपट्टीधारकाची वर्गवारी करून फोटोपास अथवा तत्सम दाखल्याचे वाटप करावे. त्यामुळे पात्र झोपडपट्टीधारक हे निश्चित होऊन त्यास सर्व शासकीय योजनाचा लाभ देणे शक्य होणार आहे.

सदर झोपडपट्टीधारक निश्चित झाल्यानंतर त्यास मिळकतकर विभागाप्रमाणे सेवाशुल्क आकारणीचे बिल दरवर्षी संबंधीतास देण्यास मान्यता देण्यात यावी.

जेणेकरून सेवाशुल्क आकारणीचा डाटा हा संगणकीकृत राहून मनपाचे उत्पन्न वाढीस भरीव मदत होईल.

**विषय क्रमांक :– ११७५ त्वर्य**

मा.फारुक इनामदार व मा.राजेंद्र शिळीमकर यांचे दि. ३०/८/२०१६ चे पत्र.

सॅलीसबरी पार्क मुस्लिम दफनभूमी येथे सिमाभिंत व सुधारणा विषयक कामे करणे(भवन रचना) साठी र.रू. ३५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, १८.सांस्कृतिक केंद्रे, खेळ, पान क्र. ११२, अ.क्र.१, शहरामध्ये सांस्कृतिक भवन, नाटयगृह उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी एसजे १६), पान क्र. २३६, अ.क्र. १५, बालगंधर्व नाटयगृह येथे फायर फायटींग सिस्टीम विषयक कामे करणे. | ३५ लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेले काम-</u>**<br>सॅलीसबरी पार्क मुस्लिम दफनभूमी येथे सिमाभिंत व सुधारणा विषयक कामे करणे(भवन रचना) | --- | ३५ लाख |

**विषय क्रमांक :– ११७६ त्वर्य**

मा.अविनाश बागवे, मा.ॲड्.रामचंद्र उर्फ चंदुशेठ कदम, मा.सौ.आरती बाबर, मा.सौ.दिपाली ओसवाल, मा.फारुक इनामदार, मा.सौ.अश्विनी कदम, मा.सौ.सुमन पठारे, मा.सौ.सुनिता गलांडे, मा.सुनिल गोगले, मा.श्रीकांत जगताप, मा.राजेंद्र शिळीमकर व मा.राजु पवार यांचे दि. ३०/८/२०१६ चे पत्र.

पुणे शहरात नागरीकांच्या कुटुंबात एखादी व्यक्ती मृत्यु पावल्यास त्यांचेवर होणाऱ्या अंत्यसंस्कारासाठीचा खर्च सर्व धर्मियांसाठी पुणे महानगरपालिकेतर्फे मोफत करण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्रमांक :– ११७७ त्वर्य**

मा.सुनिल गोगले व मा.अविनाश बागवे यांचे दि. ३०/८/२०१६ चे पत्र.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मेमोरीयल हॉकी टुरनामेंट कमिटी,पुणे यांचे वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्य महोत्सावानिमित्त हॉकी स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी र.रु.१० लाखांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक ,१७,खेळ व क्रिडांगणे, क.पंडित जवाहरलाल नेहरू स्टेडियम, पान क्र. ७५, देशी खेळांना प्रोत्सहन देण्याकरिता शिबीरे व स्पर्धा आयोजित करणे बजेट कोड-आरई २७अे१५४, | १० लाख | --- |
| **<u>नवीन सुचविलेले काम -</u>**<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर मेमोरीयल हॉकी टुरनामेंट कमिटी,पुणे यांचे वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्य महोत्सावानिमित्त हॉकी स्पर्धेचे आयोजन करणे. | --- | १० लाख |

**विषय क्रमांक :– ११७८ त्वर्य**

मा.विनायक हनमघर यांचे दि. ३०/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ५२ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ११, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र. २२७, अ.क्र.८६, पुणे शहराच्या प्रवेशद्वारावरील सर्व प्रमुख रस्त्यांवर स्वागत कमानी उभारणे | ५० लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेली कामे -</u>** | | |
| १)प्रभाग क्र.५२ अ मध्ये विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे व तदनुषंगिक कामे करणे. | --- | २५ लाख |
| २) प्रभाग क्र.५२ अ मध्ये विविध विकास कामे करणे व तदनुषंगिक कामे करणे. | --- | २५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- ११७९ त्वर्य**

मा.सौ.सुनंदा गडाळे व मा.श्रीमती पुष्पा कनोजिया यांचे दि. २६/८/२०१६ चे पत्र.

मुख्यसभा ठ.क्र. ७३ दि. ७/६/२०१६ अनुसार प्रभाग क्र.४९ अ, मध्ये र.रू. १ कोटीचे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात आलेली असून सदर रकमेतून खालील प्रमाणे कामे करणेस मान्यता द्यावी.

१) प्रभाग क्र.४९ अ मध्ये विविध विकास कामे करणे र.रुपये २० लाख
२) प्रभाग क्र.४९ अ मध्ये विविध ठिकाणी यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने रस्ते विकसित करणे र.रुपये २० लाख
३) प्रभाग क्र.४९ अ मध्ये स्मार्ट सिटी अंतर्गत बस स्टॉपचे नुतनीकरण करणे र.रुपये २० लाख
४) प्रभाग क्र.४९ अ मध्ये विविध गल्लीबोळ ट्रीमिक्स कॉंक्रीट करणे र.रुपये २० लाख
५) प्रभाग क्र.४९ अ मध्ये गाडीखाना दवाखान्यात डायलिसिस सेंटर चालू करणे र.रुपये २० लाख

**विषय क्रमांक :- ११८० त्वर्य**

मा.राजेंद्र शिळीमकर व मा.सौ.मुक्ता टिळक यांचे दि. ३०/८/२०१६ चे पत्र.

बिबवेवाडी व धनकवडी येथे जनता वसाहत झोपडपट्टीचे पुनर्वसन करण्यात येऊन त्या ठिकाणी निवासी व व्यवसायिक गाळे ११ वर्षे भाडे पट्याने दिलेले आहेत. त्याला २० ते २५ वर्षे झाले आहेत.

त्यामुळे कुटुंब मोठी झाली असून त्यांना त्याठिकाणी राहण्यासाठी जागा कमी पडत आहे. त्यामुळे काही भागात वरचे मजले वाढवलेले आहेत.

त्या नागरिकांना जागा पुरत नसल्याने व काही करणास्तव गाळे हस्तांतर करावे लागत आहे. त्या गाळ्याचे २०१० वर्षापासून हस्तांतर व वारस हक्काच्या नोंदी थांबलेल्या आहेत.

त्या त्वरीत सुरू करण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्रमांक :- ११८१ त्वर्य**

मा.सौ.मुक्ता टिळक व मा.सुनिल गोगले यांचे दि. ३०/८/२०१६ चे पत्र.

डोबा मार्केटींग या एजन्सीला म.न.पा.ने स्थापन केलेल्या ग्राफीक डिझायनरच्या पॅनेलमध्ये समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात यावी.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**